**MHAU070024982025**

**वादी तर्फे सा.क्र.२**

**नि.दि.दावा क्रमांक ५१८/२०२५**
**निशाणी क्रमांक ७९ लगत**

**उलटतपास प्रतिवादी तर्फे विधीज्ञ श्री. सपकाळ यांच्या मार्फत**

हे म्हणणे खरे आहे की, वादी हा माझा भाऊ आहे व वादी क्र.२ माझा पुतण्या आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी व वादी एकत्र न्यायालयात आलो आहे. मला साक्ष देण्याकामी समन्स मिळाले नव्हते. मला वादीच्या वकीलांनी साक्ष देण्यासाठी कळवले होते. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या वकीलांनी मला साक्ष कशी द्यायची हे सांगीतले होते. साक्षीदाराला प्रश्न विचारला की, वादीच्या वकीलांनी तुमच्या सहया घेतल्या का, साक्षीदार सांगतो की, मी सहया करुन दिल्या. कागद शेख लतीफ यांनी आणला होता. साक्षीदाराला प्रश्न विचारला की, कागदावरील मजकुर हा शेख लतीफ यांनी लिहुन आणला होता, साक्षीदार सांगतो की मी वाचुन सहया केल्या होत्या. त्यातील मजकुर कोणी लिहीला होता हे मला माहीती नाही, मी लिहिलेला नाही.

**०२.** माझी शिंगीगावामध्ये शेती नाही. मला अजुन दुसऱ्या कोणत्याही गावाला शेतजमीन नाही. माझे शेख लतीफ याच्या जमीनीत जाणे येणे नाही. मी सुधाकर शिरसाठ याला ओळखतो, तो आम्हाला खेटुन आहे. मी शिवाजी ढगारे याला ओळखत नाही, त्याचे नाव ऐकुन आहे. त्याची जमीन कोठे आहे हे मला माहिती नाही. मी नाथा माघाडे, उषा तायडे व वसंत मुळे यांना ओळखत नाही, त्यांची नावे ऐकुन आहे. त्यांच्या जमीनी आमच्या बांधाला खेटुन आहे. हे म्हणणे खरे आहे की, सुधाकर शिरसाठ, नाथा माघाडे, उषा तायडे वसंत मुळे यांच्या दक्षीणेकडून ओढा जातो. साक्षीदार सांगतो की, त्यांच्या शेतामधुन ओढा जातो. हे मला माहीती नाही की, ओढयाला खेटून ढंगारे याची शेती आहे.

**०३.** हे म्हणणे खरे नाही की, वादी व प्रतिवादी यांच्या मधील बांधावरुन रस्ता आहे, म्हणुन वाद सुरु आहे. हे म्हणणे खरे नाही की, तहसीलदार गंगापूर यांनी बांधावरुन रस्ता आहे असा आदेश दिलेला आहे. हे मला माहीती नाही की, तहसीलदार कार्यालयातील अधिकारी यांनी जागेवर

येऊन पंचनामा केला होता. मला दावा मिळकतीच्या चतु:सीमा सांगता येतील. माझया शेतजमीनीच्या दक्षीण बाजुला नाथा माघाडे यांची जमीन आहे. शिवाजी ढंगारे व रुकमणबाई ढंगारे यांची जमीन माझया जमीनीच्या बाजुला नाही. मला रुतुजा खंबाट व शिवाजी ढंगारे यांच्या जमीनी कोठे आहेत हे माहीत नाही.

**०४.** मला कोणाच्या जमीनी कोठे आहे याबाबतचा नकाशा माहीती आहे. मला सदर नकाशामध्ये माझा भाऊ शेख लतीफ, नाथा माघाडे व रस्ता असे नमुद केलयाचे माहीती आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी पुरावा शपथपत्रासोबत नकाशा दाखल केलेला नाही. मला दाव्यासोबत जोडलेला नकाशा वकीलांनी दाखवलेला आहे. मला वकीलांनी नकाशा समजावुन सांगीतलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रकरणाचा निकाल भावाच्या बाजुने लागावा म्हणुन त्याला मदत व्हावी या उददेशाने मी साक्ष देत आहे.

**०५.** आता मला प्रतिवादीच्या वकीलांनी वादीने दाव्यासोबत दाखल केलेला चतु:सीमा नमुद केलेला नकाशा दाखवला. त्यामध्ये रुतुजा पंकज खंबाट व शिवाजी ढंगारे यांची नावे नमुद असल्याचे दिसते. सदर नकाशा यास **निशाणी ८१** देण्यात येते. गट नं.१६ येथे दोन रस्ते आहेत. हे म्हणणे खरे नाही की, वादी यांनी मला साक्ष देण्यासाठी सांगीतले व त्यांनीच माझया सहया घेतल्या. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीच्या चुकीच्या चतु:सीमा नमुद केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यासोबत दाखल केलेला नकाशा चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या जमीनीच्या दक्षीणेकडून पुर्व पश्चीम असा रस्ता अस्तीत्वात नाही हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा रस्ता प्रतिवादी वापरत होते. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.१६ मध्ये माझी जमीन आहे हे मी खोटे लिहीले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीच्या शेताकडे जात नाही त्यामुळे मला वस्तुस्थीती माहीती नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या सांगण्यावरुन मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

Digitally signed by NILESH RAJARAM INDALKAR
Date: 2026.02.05 11:09:16 +0530

दिनांकः- ०४.०२.२०२६

(निलेश रा. इंदलकर)
दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
गंगापूर